१६८८
श्री ७/१२

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

(पापुढील पत्रव्यवहारात क्रमांक व दिनांक यांचा उल्लेख करावा.)
(जागेच्या वा इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्काविषयी सिद्धतेसाठी घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)
(कमेन्समेंट सर्टिफिकेट)

सुधारित

## बांधकाम चालू करणेकरिता दाखला

सदर बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ ची कलम ४५ यातील तरतुदीप्रमाणे आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ ची कलमे (सेक्शन्स)२५३ व २४५ यातील तरतुदीप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.

बीपी/चिखली/१२६/२०१६, दि. २१/११/२०१६ करिता.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी -१८.

क्रमांक -बी.पी./ चिखली /७७/२०१९

दिनांक: २८ / ०६ / २०१९

श्री./श्रीमती/मे. ओम साई बिल्डकॉन तर्फे श्री. संदिप चंद्रकांत जाधव व इतर दोन व श्री. बाळासो हरीभाऊ जाधव व इतर तिन तर्फे मे. साईश्रुती डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. सुदाम पांडुरंग मोरे व इतर तिन.

व्दारा : ला. आ. / ला. स. श्रीम. ए. व्ही. तापकीर

तळमजला, सिताराम दर्शन, गावडे पार्क, चिंचवड, पुणे ३३ यांना

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांजकडून

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलमे (सेक्शन्स) २५३ व २५४ अन्वये पिंपरी - चिंचवड महानगरपालिकेच्या सीमेतील मौजे चिखली येथील सर्व्हे नं. गट नं. ८२५पै, ८३०, ८३४पै सिटी सर्व्हे नं. — प्लॉट नं. — मधील बांधकाम करण्यासाठी तुम्ही महानगरपालिकेला अर्ज दाखल केला तो दिनांक ०८/०५/२०१९ रोजी प्राप्त झाला. यावरून बांधकाम करण्यास खाली नमूद अटींवर व जादा अट क्र. — ते — नुसार तुम्हास संमतीपत्र देण्यात येत आहे.

१) सोबतच्या मंजूर नकाशात दाखविल्याप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर बांधकाम करणे बंधनकारक आहे.
२) जोत्यापर्यंत काम आल्यानंतर नगररचना व विकास विभागाकडून सेटबॅक तपासून घ्यावेत. त्याशिवाय जोत्यावरील काम सुरू करू नये.
३) सोबतच्या नकाशावर नमूद करण्यात आलेल्या अटींवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.
४) ज्या भूखंडावर नवीन इमारत बांधकाम करण्यात आले आहे त्या इमारतीच्या भोगवटा दाखला मागण्यापुर्वी विकसकाने इमारतीसमोर कंपाउंड वॉलच्या आत व बाहेर झाडे लावून ती व्यवस्थित वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था करावी त्या शिवाय भोगवटा दाखला मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरूर ते संरक्षण कुंपण विकसकाने करावयाचे आहे तसेच महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार योग्य ती अनामत रक्कम कोषागारात भरणे बंधनकारक आहे.
५) इमारतीचा भोगवटा दाखला देतांना रस्त्यावरील व आतील बाजूस टाकण्यात आलेले इमारतीचा राडारोडा उचलून जागा साफ केल्याशिवाय अर्जाचा विचार केला जाणार नाही.
६) नवीन बांधकाम सुरू करताना संबंधित जागेमध्ये झाडे असल्यास ती ट्री ॲथॉरिटीची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय तोडू नयेत अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येते, याची नोंद घ्यावी.
७) आपण संबंधित बांधकाम हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१२ व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतुदीचा भंग करून सक्षम अधिकाऱ्याची पूर्व परवानगी न घेता सुरू केल्याबद्दल/तसेच इकडील मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम न करता त्यात बदल व फेरफार करून या बांधकामाचे सुधारित नकाशास पुर्व परवानगी न घेता बांधकाम केल्याबद्दल इमारतीचे भोगवटा पत्रक न घेता भोगवटा केल्याबद्दल, आपणाविरूध्द नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्याचा म.न.पा. चा हक्क राखून ठेवला आहे.
८) बांधकाम साहित्य अथवा जुन्या बांधकामाचा निघालेला राडारोडा सार्वजनिक रस्त्यावर मनपा चे परवानगी शिवाय ठेवता येणार नाही. जर हे साहित्य सार्वजनिक जागेवर ठेवल्याचे आढळल्यास त्यासाठी सुधारित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार रू. ३०००/- प्रति दिन याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
९) पाणी पुरवठा, जलनि:सारण, उद्यान, अग्निशामक इत्यादि आवश्यक विभागाचे ना हरकत दाखले इकडे सादर करावेत.
१०) इमारतीच्या तळमजल्यावर गाळेधारकाच्या नावे दर्शविलेली टपालपेटी सुयोग्य ठिकाणी बसविणे बंधनकारक राहील.
११) विकास आराखडयातील रस्ता रूंदीने बाधीत क्षेत्र नियमानुसार महानगरपलिकेच्या ताब्यात देणे बंधनकारक आहे.
१२) इमारतीच्या सलोह काँक्रिट (आर.सी.सी.) कामाच्या सर्व बाजूंकरिता आधार व आकारासाठी लाकडांचा वापर करू नये त्यासाठी लोखंडी आधारांचा वापर करणे बंधनकारक राहील.